महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

पत्र क्र./पुविमं/मु. वि./941
पुणे-४११००५
दि. १३/०२/२०२४
98

प्रती,

केंद्र समन्वयक/मुख्याध्यापक,
मुक्त विद्यालय संपर्क केंद्र शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय: इयत्ता ५ वी / ८ वी मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन सत्राचे आयोजनाबाबत.

संदर्भ: राज्य मंडळाचे क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं/५६४, दि. ०९/०२/२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, मुक्त विद्यालय मंडळाच्या इ. ५ वी व इ. ८ वी साठी दि. २०/०२/२०२४ ते दि. ०३/०३/२०२४ या कालावधीत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यात यावे व सदर सदर विद्यार्थ्यांचे संपर्क केंद्रामार्फत मूल्यमापन सत्राचे आयोजन दि. १२/०३/२०२४ ते दि. ३०/०३/२०२४ या कालावधीत करण्यात यावे. त्याबाबतच्या सविस्तर सूचना सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भिय पत्रामध्ये नमूद केलेल्या असून सदर सूचना सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्या.

सोबत: उपरोक्त संदर्भिय पत्र.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

Open Schooling
S.R. 832-A, Final Plot No. 178,179,Near
...wani, Behind Agharkar Research
...te, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ
स.न.८३२-फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
बालचित्रवाणीशेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel.No. 020-25705122/25705140/25705000
Email - msbospune@gmail.com

Fax No. 020-25665807
website - msbos.mh-ssc.ac.in

क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं./ 564
पुणे -४११००४
दिनांक: -०९/०२/२०२४.

प्रति,

केंद्र समन्वयक/मुख्याध्यापक,
संबंधित संपर्क केंद्रशाळा.

विषयः- इयत्ता ५ वी/८ वी मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यासाठी मूल्यमापन सत्राचे आयोजनाबाबत.

संदर्भ- या कार्यालयाचे क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं./५४७७, दिनांक २२/१२/२०२३ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुलक्षून आपणास कळविण्यात येते की, मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व ८ वी साठी दिनांक २०/०२/२०२४ ते ०३/०३/२०२४ या कालावधीत ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यात यावे व सदर विद्यार्थ्यांचे संपर्क केंद्रामार्फत मूल्यमापन सत्राचे आयोजन दिनांक १२/०३/२०२४ ते ३०/०३/२०२३ या कालावधीत करण्यात यावे.

सदर परिपत्रकातील सूचनांनुसार आपल्या संपर्क केंद्रावरील विद्यार्थ्यांकरिता निर्धारित मुदतीत मूल्यमापन सत्राचे नियोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सदर विद्यार्थ्यांचे मंडळाच्या **http://msbos.mh-ssc.ac.in** या संकेतस्थळावरुन दि. १०/०३/२०२४ पासून ऑनलाईन प्रवेशपत्र (Admmision Card) अपलोड करण्यात येणार आहे, सदर प्रवेशपत्र डाउनलोड करुन संबंधित विद्यार्थ्यांचे मूल्यमापन सत्राचे आयोजन करुन, परीक्षा घेण्यात यावी.

म. रा. मा. उच्च मा. शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११ ००५
13 FEB 2024
3971

(माणिक बांगर)
सचिव (प्र.),
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,पुणे.

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी -
विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील संबंधित संपर्क केंद्रावर मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.



B+ email
मा.वि.-४१

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे-०४

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी मध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन आवेदनपत्र भरणे व मूल्यमापन कार्यपध्दती इ.चा तपशील खालीलप्रमाणे-

### मूल्यमापन आवेदनपत्र भरण्यासाठी सूचना

१. मुक्त विद्यालय मंडळाच्या मूल्यमापन प्रक्रियेचे आवेदनपत्रे भरण्यासाठीचा कालावधी दिनांक **२०/०२/२०२४ ते ०३/०३/२०२४** असा राहील. आवेदनपत्रे सादर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही. ज्या विद्यार्थ्यांनी मूल्यमापन सत्रासाठी ऑनलाईन आवेदनपत्रे भरलेली आहेत त्यांनी पुनश्च आवेदनपत्रे भरण्याची आवश्यकता नाही. याची नोंद घ्यावी.

२. उमेदवाराने आपले मूल्यमापन आवेदनपत्र संपर्क केंद्रावरून ऑनलाईन पध्दतीने विहित शुल्कासह विहित मुदतीत भरणे आवश्यक आहे.

३. संपर्क केंद्रशाळेने सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन शुल्क व प्रात्यक्षिक शुल्क चलनाव्दारे सोबत दिलेल्या निर्देशानुसार भरावे व त्याची रितसर पावती घ्यावी. मूल्यमापन शुल्क पुढीलप्रमाणे असेल.

अ) मूल्यमापन शुल्क रु १००/- प्रती विषय.

आ) प्रात्यक्षिक शुल्क रु २५/- प्रती विषय. (फक्त कला विषय व NSQF विषयासाठी)

इ) प्रमाणपत्र शुल्क रु १०/-

४. **मूल्यमापन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या तांत्रिक सूचना -**

क) मुक्त विद्यालय मंडळाच्या **http://msbos.mh-ssc.ac.in** या संकेतस्थळावर क्लिक करून उमेदवाराने संपर्क केंद्रवरून ऑनलाईन पध्दतीने मूल्यमापन आवेदनपत्र भरावयाचे आहे.

ख) संपर्क केंद्राने आपले संपर्क केंद्र क्रमांक (उदा.M0111001) टाकून Login करावे. (आवेदनपत्र भरण्याबाबतच्या सूचना वेबसाईटवर देण्यात आलेल्या आहेत त्यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.)

ग) उमेदवाराचा प्रवेशपत्र अर्ज क्रमांक/नावनोंदणी प्रमाणपत्र क्रमाक टाकल्यानंतर उपलब्ध होणारी प्राथमिक माहितीची पडताळणी करून आवश्यकता असल्यास त्यामध्ये दुरूस्ती करून घ्यावी. उमेदवारास माध्यम व विषयांच्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्यामध्ये बदल करावयाचा असल्यास संपर्क केंद्राने उमेदवाराच्या विनंतीअर्जासह व शिफारशीसह विभागीय मंडळामार्फत मुक्त विद्यालय मंडळास विहित पध्दतीने प्रस्ताव सादर करावा.

घ) संपर्क केंद्राने उमेदवाराकडून विषयनिहाय मूल्यमापन शुल्क, प्रात्यक्षिक शुल्क व प्रमाणपत्र शुल्क घेवनू रितसर पावती द्यावी.

च) आपल्या संपर्क केंद्रावरील सर्व उमेदवारांचे मूल्यमापन आवेदनपत्र (संपूर्ण व अचूक माहिती भरलेले आवेदनपत्रे) दाखल करून एकत्रित मूल्यमापन शुल्काची यादी तयार करून पावती घेवून एकत्रित शुल्क सोबत दिलेल्या बँक खात्यामध्ये रोखीने/ऑनलाईन/ नेटबँक/NEFT/ RTGS व्दारे जमा करण्यात यावी.

५. सदरचे शुल्क भरण्यासाठी बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| Name of A/c. | MAHARASHTRA RAJYA MUKTA VIDYALAYA MANDAL |
| Bank Name | HDFC Bank |
| Branch Name | Bhandarkar Road, Pune -411004 |
| A/c. No. | 50200036019989 |
| IFSC Code No. | HDFC0000007 |

विहित शुल्क जमा झाल्याची खातरजमा झाल्यानंतरच मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करण्यात येईल. उदा. आवेदनपत्र छाननी, प्रवेशपत्र देणे इ.

६. मूल्यमापन प्रक्रियेचे आवेदनपत्र भरल्यानंतर उमेदवारास मूल्यमापन प्रवेशपत्र संपर्क केंद्रामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

कृ.मा.प.

## मूल्यमापन

### ७.(अ) प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष)/उच्च प्राथमिक स्तर – (इयत्ता ८ वी समकक्ष)

१. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे **मूल्यमापन दिनांक १२/०३/२०२४ ते ३०/०३/२०२४** या कालावधीत करण्यात येईल.

२. मूल्यमापन योजना मुक्त विद्यालय मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार राहील. तसेच इयत्ता ५ वी व ८ वी साठी शासन निर्णय दिनांक २०/०८/२०१० नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (C.C.E.) पध्दती लागू राहील.

३. मूल्यमापन आराखडा –

अ. इयत्ता ५ वी –भाषा, गणित, परिसर अभ्यास

ब. इयत्ता ८ वी – भाषा, गणित, विज्ञान, इतिहास–ना.शास्त्र, भूगोल

| इयत्ता | आकारिक मूल्यमापन | संकलित मूल्यमापन |
|---|---|---|
| पाचवी | ५० | ५० |
| आठवी | ४० | ६० |

४. **NSQF** विषयांचे मूल्यमापन ३० गुण लेखी व ७० गुण प्रात्यक्षिक असे राहील. संबंधित विषयांचे मूल्यमापन मंडळ निर्देशानुसार अतिथी निदेशकांमार्फत करण्यात येईल.

५. कला विषय गटातील विषयांना लेखी परीक्षा ५० गुणांची व प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुणांची राहील. संबंधित विषयांचे मूल्यमापन मंडळ निर्देशानुसार अतिथी निदेशकांमार्फत करण्यात येईल.

६. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांचेच मूल्यमापन करण्यात येईल.

७. सर्व ५ विषयांत किमान अध्ययन क्षमता प्राप्त झाल्यासच प्राथमिकस्तर/उच्च प्राथमिकस्तर शिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मुक्त विद्यालय मंडळामार्फत मिळेल.

८. मूल्यमापनाचे माध्यम उमेदवाराने निवडल्याप्रमाणे मराठी/इंग्रजी/उर्दू राहील.

९. सर्व विषयांच्या मूल्यमापनासाठी एकाच सत्रात प्रविष्ठ होणे बंधनकारक असणार नाही. पाच वर्षातील एकूण नऊ मूल्यमापन सत्रामध्ये हव्या त्या विषयाच्या मूल्यमापनासाठी उमेदवार प्रविष्ठ होऊ शकेल.

१०. उपरोक्त निर्देशानुसार आकारिक व संकलित मूल्यमापनाच्या प्रश्नपत्रिका विहित नमुन्याप्रमाणे संपर्क केंद्र स्तरावरून निर्मिती व संपादित करून घ्याव्यात.

११. मूल्यमापन प्रक्रियेनंतर सोबतच्या तक्त्यानुसार उमेदवारांचे विषयनिहाय श्रेणी नमूद करून विहित मुदतीत मूल्यमापन तक्ता विभागीय मंडळामार्फत पुढील प्रक्रियेसाठी सादर करावा.

**ब) मूल्यांकन तक्ता भरण्यासाठीच्या सूचना –**

१) संपर्क केंद्र व इयत्तानिहाय प्रत्येक उमेदवारांची त्यांनी निवडलेल्या विषयांच्या नांवासह श्रेणीची नोंद करावी.

२) आकारिक व संकलित मूल्यमापनाच्या सर्व नोंदी व अभिलेख स्वतंत्ररित्या संपर्क केंद्र स्तरावर जतन करून ठेवण्यात यावे. वेळोवेळी वरिष्ठांच्या भेटी दरम्यान अवलोकनास उपलब्ध करून देण्यातयावे.

सचिव,
म.राज्य मुक्त विद्यालय मंडळ,पुणे.

# संमती पत्र

मी, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे मार्फत घेण्यात येणाऱ्या प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष)/उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी समकक्ष) सन २०२४ मधील मूल्यमापन प्रक्रियेसाठी अर्ज करीत आहे. मंडळाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व नियम व सूचनांचे पालन करण्यास माझी संमती आहे. त्यासंबंधीची विषय योजना मला माहिती असून

५) मी चुकीची विषययोजना निवडल्यास माझी संबंधित विषयाची संपादणूक रद्द करण्यासंबंधीचा मंडळाचा निर्णय माझ्यावर बंधनकारक असेल.

६) उमेदवारासाठीच्या सर्व सूचना मला ज्ञात असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

७) मला संपर्क केंद्राकडून मूल्यमापन प्रक्रिया शुल्काची पावती प्राप्त झालेली आहे.

८) मी इतर कोणत्याही मान्यताप्राप्त समकक्ष मंडळाच्या प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष)/उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी समकक्ष) मूल्यमापन प्रक्रियेस प्रविष्ठ होऊन यशस्वी झालेलो नाही.

स्थळ:- दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी

४) उमेदवाराने दिलेल्या माहितीची मी पडताळणी केली असून ती बरोबर असल्याची खात्री करून प्रमाणित करीत आहे.

५) आवेदनपत्र व मूल्यमापन प्रक्रिया शुल्क आणि उमेदवारासाठीच्या सूचनांची माहिती उमेदवाराला दिलेली आहे.

६) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या नियमानुसार उमेदवार प्राथमिक स्तर (इयत्ता ५ वी समकक्ष)/उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी समकक्ष) मूल्यमापन प्रक्रियेस प्रविष्ठ होण्यास पात्र असल्याचे मी प्रमाणित करीत आहे.

संपर्क केंद्र समन्वयक,
संपर्क केंद्रशाळा
(सही व शिक्का)